# ६३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरिता)**

डॉ. आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील जयसिंगपूर - उदगांव सहकारी बँक लि. जयसिंगपूर, (मल्टी-स्टेट) (ता. शिरोळ) या बँकेची सन २०२१-२२ ची ६३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, गुरुवार दि. २५/०८/२०२२ ई. रोजी दु. ठिक ०१.०० वा. दि मर्चन्ट असोशिएशन हॉल, ९ वी गल्ली, जयसिंगपूर येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेकरीता बोलविणेत येत आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

## * सभेपुढील विषय *

१) मागील दिनांक २३/०९/२०२१ ई. रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा सभावृत्तांत वाचून कायम करणे.
२) दिनांक ३१/०३/२०२२ ई. अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षकांनी सादर केलेला अहवाल, ताळेबंद व नफा-तोटापत्रक स्वीकृत करणे.
३) सन २०२०-२०२१ या सालाचे वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.
४) सन २०२१-२०२२ या सालातील वैधानिक लेखापरिक्षक मे. भोसले वांगीकर व परणावर चार्टड अकौंटट यांचेकडून मिळालेला लेखापरीक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.
५) सन २०२१-२०२२ या सालातील झालेल्या निव्वळ नफा विभागणीस मंजूरी देणे.
६) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२२-२०२३ चे अंदाज पत्रकास मंजूरी देणे व सन २०२१-२०२२ या सालात अंदाजपत्रकापेक्षा कमी-जादा झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजूरी देणे.
७) सन २०२२-२०२३ या वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षक नेमणुकीबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे व अनुषंगिक कार्यवाही करणे.
८) सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता अंतर्गत, कंकरंट व कर लेखापरिक्षक यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहेनताना ठरविणे.
९) बँकेच्या मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या नातेवाईकांना सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात दिलेल्या कर्जाची माहीती घेणे.
१०) सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात संचालक मंडळाच्या मान्यतेने, तडजोडीने केलेल्या थकीत कर्ज वसुलीस मंजुरी देणे.
११) बँकेच्या पोटनियम दुरुस्तीबाबत विचार विनिमय करणे.
१२) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांच्या अनुपस्थितीस रजा मंजूर करणेबाबत विचार करणे.
१३) मे. अध्यक्षसो यांचे परवानगीने आयत्यावेळी येणारे विषयावर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**श्री. जे. एम. बोटे**
कार्यकारी संचालक

स्थळ - जयसिंगपूर.
दिनांक- २७/०७/२०२२

## * विशेष सुचना *

१) गणपुर्ती अभावी सभा तहकुब झालेस त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा भरेल व त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता भासणार नाही.
२) सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या सुचना व बँकेच्या कामकाजासंबंधी काही प्रश्न विचारावयाचे असतील तर सभासदांनी दिनांक २२/०८/२०२२ पुर्वी बँकेकडे लेखी कळवावे.
३) पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रु. १०००/- झाली असुन ज्या सभासदांचे भागभांडवल अपुर्ण आहे त्यांनी ते पुर्ण करावे.
४) सभासदांनी आपला पत्ता बदलला असलेस नवीन पत्ता प्रधान कार्यालयाकडे त्वरीत कळवावा तसेच सभासदांनी आपल्या सर्व खात्याची के.वाय.सी. आपल्या शाखेत जाऊन पुर्ण करावी अन्यथा के.वाय.सी. अपुर्ण असलेने आपले खाते फ्रिज करणेत येतील याची कृपया नोंद घ्यावी.
५) अहवालाच्या व हिशोब पत्रकाच्या प्रती प्रधान कार्यालयात व सर्व शाखा कार्यालय येथे सभासदांच्या माहीतीसाठी ठेवणेत आलेल्या आहेत. तसेच www.jusbbank.com या वेबसाईट वर बँकेचा अहवाल पहावयास मिळेल.